आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

1. माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि भूतान नरेश यांच्यासह अनेक मान्यवरांची श्रद्धांजली.
2. गोंदियात जहाल नक्षलवाद्याचे पोलिसांपुढे आत्मसमर्पण.
3. बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेतल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताच्या नितेश रेड्डीचं पहिलं कसोटी शतक.
4. आज नागपूर गोंदिया अमरावती अकोला या जिल्ह्यात पावसाची शक्यता.

---

डॉ.मनमोहन सिंग-अंत्यसंस्कार

माजी पंतप्रधान आणि जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ.मनमोहन सिंग यांना आज, शोकाकुल वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिल्लीच्या निगम बोध घाटावर आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात, अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मीय संस्कारांनुसार, त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला, भूतान नरेश, जिगमे खेसर, नामग्येल वांगचुक यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री तसंच विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी यांच्यासह अनेक नेते, उच्च पदस्थ अधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होतं. सकाळी दहा वाजता त्यांची अंत्ययात्रा, काँग्रेस कार्यालयातून निघाली. फुलांनी सजवलेल्या सैन्य दलाच्या वाहनावर त्यांचं पार्थिव ठेवण्यात आलं होतं. हजारोंच्या संख्येनं सर्वसामान्य नागरिकही, यात सामील झाले होते. पावणे बाराच्या सुमारास त्यांचं पार्थिव, दिल्लीच्या निगम बोध घाटावर आणण्यात आलं.

मनमोहन सिंग यांच्या शवपेटीवरील तिरंगा त्यांच्या कुटुंबियांकडे प्रदान करण्यात आला. त्यानंतर त्यांचं पार्थिव अंत्य संस्कारासाठी चंदनाच्या चितेवर नेण्यात आलं. यावेळी शीख धर्मातली प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर त्यांना, हवेत बंदुकीच्या फैरी झाडून, मानवंदना देण्यात आली. डॉ.मनमोहन सिंग अमर रहे च्या घोषणांनी यावेळी, परिसर दुमदुमून गेला होता. डॉ.मनमोहन सिंग यांचं गुरुवारी रात्री, दिल्लीच्या रुग्णालयात, वृद्धापकाळानं, निधन झालं. काल त्यांचं पार्थिव त्यांच्या निवासस्थानी

आणि आज काँग्रेस कार्यालयात अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आलं. डॉ.मनमोहन सिंग यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजूजू यांच्यासह, अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ.मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल जगातल्या अनेक देशांनी आपले शोकसंदेश पाठवले आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, एका संदेशादवारे डॉ.मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहली आहे......

*पूर्व प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंह जी के निधन ने हम सभी के ह्रदय को गहरी पीड़ा पहुचाई है । उनका जाना एक राष्ट्र के रूप में भी हमारे लिए बहोत बड़ी क्षति है, विभाजन के उस दौर में बहोत कुछ खोकर भारत आना और यहाँ जीवन के हर क्षेत्र में उपलब्धिया हासिल करना ये सामान्य बात नहीं है । अभावों और संघर्षो से ऊपर उठकर कैसे उचाईयो को हासिल किया जा सकता है उनका जीवन ये सिख भावी पीढ़ी को देता रहेगा । एक नेक इन्सान के रूप में, एक विद्वान अर्थशास्त्र के रूप में और रिफॉर्म्स के प्रति समर्पित लीडर के रूप में उन्हें हमेशा याद किया जायेगा । एक चुनौतीपूर्ण समय में उन्होंने रिझर्व बैंक के गव्हर्नर की भूमिका निभाई । पूर्व प्रधानमंत्री भारतरत्न श्री पी.व्ही.नरसिम्हा राव जी के सरकार के वित्त मंत्री रहते हुए, उन्होंने वित्तीय संघर्ष से घिरे देश को एक नई अर्थव्यवस्था के मार्ग पर प्रशस्त किया । प्रधानमंत्री के रूप में देश के विकास में और प्रगति में उनके योगदान को हमेशा याद किया जायेगा ।*

केंद्रसरकारने ७ दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आला आहे.

---------------------------------------------------

डॉ.मनमोहन सिंग - स्मारक

डॉ.मनमोहन सिंह यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी, सरकार जागा देऊ करणार असल्याचं, केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती, काँग्रेसचे अध्यक्ष, मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच, गृहमंत्री अमित शहा यांनी, सिंह यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून, त्यांना ही माहिती दिली. डॉ.मनमोहन सिंह यांचं स्मारक उभारलं जाईल असा निर्णय, काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला असून, काँग्रेस पक्षाला ही माहिती देण्यात आली आहे असं, भाजप खासदार आणि प्रवक्ता, सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितलं. देशात आर्थिक विकासाचा पाया घालणारे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचा योग्य तो सन्मान राखण्यासाठी, भाजप आणि पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वा खालील, एन.डी.ए. सरकार वचनबद्ध आहे असंही, त्यांनी स्पष्ट केलं.

---------------------------------------------------

नाना पटोले

पंतप्रधान म्हणून मी कमजोर होतो की कणखर हे इतिहास ठरवेल असं डॉ.मनमोहन सिंग म्हणाले होते. आज मनमोहन सिंग यांना सर्व जग, श्रद्धांजली देत असताना त्याची प्रचिती येत आहे. गरिबीतून सुरुवात करुन, बुद्धीमत्तेच्या जोरावर, पंतप्रधान होऊन देशाला आर्थिक दिशा आणि आर्थिक शिस्त लावण्याचं काम, डॉ.मनमोहन सिंग यांनी केलं ते देश तसंच जग विसरु शकत नाही. असे महान व्यक्तिमत्व आपल्यात नाही याचं दुःख असून, देशासाठी त्यांनी केलेलं समर्पण देश कधीही विसरणार नाही असं मत, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केलं. माजी पंतप्रधान दिवंगत डॉ.मनमोहन सिंग यांना प्रदेश काँग्रेसच्या मुख्यालयात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी ते बोलत होते.

---------------------------------------------------

नक्षलवादी आत्मसमर्पण

गोंदियात देवा सुमडो मुडाम नामक जहाल नक्षलवाद्यानं आत्मसमर्पण केलं असून, तो छत्तीसगडच्या, बिजापूर जिल्ह्यातील, गुंडम सुटबाईपारा, इथला रहिवासी आहे. त्याच्यावर सात लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. देवा मुडाम यानं काल जिल्हाधिकारी, प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या समक्ष, आत्मसमर्पण केलं. गोंदिया जिल्हा पोलीसांच्या आत्मसमर्पण संबंधी केलेल्या आवाहनाला प्रभावित होवून आणि माओवादी संघटनेत होणारा त्रास आणि अत्याचारास कंटाळून, देवा सुमडो मुडाम यानं आत्मसमर्पण केलं आहे. आत्मसमर्पित माओवादी देवा, अति नक्षल प्रभावित भागात असल्यानं त्याच्या गावात पुर्वी पासुनच, सशस्त्र गणवेषधारी नक्षलवाद्यांचा वावर होता. माओवाद्यांच्या भुलथापा आणि प्रलोभनांना बळी पडुन, त्यांच्या निर्देशाप्रमाणे लहान पणापासुनच तो, नक्षल चळवळीत सहभागी होवुन, बाल संघटनामध्ये काम करीत होता.

---------------------------------------------------

बॉर्डर गावस्कर

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या, बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या, मेलबर्न इथं सुरू असलेल्या, चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवस अखेर भारतानं आपल्या पहिल्या डावात, नऊ बाद ३५८

धावा केल्या आहेत. पहिल्या डावात, भारत अजूनही, ११६ धावांनी पिछाडीवर आहे. सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी, भारतानं कालच्या पाच बाद १६४ धाव संख्येवरुन आपला पहिला डाव पुढे सुरू केला. मात्र काल नाबाद असलेला ऋषभ पंत २८ तर, रविंद्र जडेजा १७ धावा करून बाद झालेत. त्यानंतर नितेश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी आठव्या गड्यासाठी, १२७ धावांची भागिदारी करत, भारताला फॉलो ऑनच्या संकटातून बाहेर काढलं. नितेश रेड्डी यानं, आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीतलं पहिलं शतक झळकावलं. वॉशिंग्टन सुंदर ५० धावांवर आणि त्यापाठोपाठ जसप्रीत बुमराह, शून्यावर बाद झाला. तिसऱ्या सत्रात आधी अपुऱ्या प्रकाशामुळ आणि त्यानंतर, पाऊस पडू लागल्यानं, उरलेला खेळ होऊ शकला नाही. दिवसअखेर नितेश रेड्डी १०५ तर मोहम्मद सीराज दोन धावा करून खेळपट्टीवर टिकून होते.

---------------------------------------------------

अदिती तटकरे

राज्यात महायुतीचे सरकार आल्यावर, लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्या निधीवरून, विरोधक सत्ताधारी पक्षावर आरोप करीत आहेत. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री, आदिती तटकरे या, पुणे दौऱ्यावर आल्या असताना, याबाबत स्पष्टीकरण दिलं. या योजनेमुळ शिक्षकांचा पगार होण्यास उशीर होणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यावर तटकरे म्हणाल्या की ही चुकीची माहिती असून, महिला बालविकास विभागाला इतर कोणत्याही खात्याचा निधी वळविण्यात आलेला नाही.

---------------------------------------------------

अभिरुप मुलाखत प्रशिक्षण

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यु.पी.एस.सी.च्या २०२४-२५ यावर्षी, नागरी सेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या राज्यातील उमेदवारांसाठी, उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्यावतीनं, चार जानेवारी ते सहा एप्रिल २०२५ दरम्यान, नवी दिल्ली इथल्या जुन्या महाराष्ट्र सदनात, 'अभिरुप मुलाखत प्रशिक्षण-२०२४-२५' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पात्र उमेदवारांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असं आवाहन, या कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक तथा, भारतीय प्रशासकीय सेवा, पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपुरचे संचालक, डॉ.प्रमोद लाखे यांनी केलं आहे.

---------------------------------------------------

साहित्य अकादमी

नियतकालिकं ही अभिव्यक्तीचं प्रभावी साधन असून, सामाजिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. परंतु नियतकालिकं अधिक व्यापक होण्यासाठी आणि अधिकाधिक वाचकांपर्यंत नियमितपणे पोचण्यासाठी त्यांच्या कागद, छपाई, वितरणावर नाममात्र कर असावा असं मत, ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी व्यक्त केलं. साहित्य अकादमी आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमानं आज 'मराठीतील वाङ्मयीन आणि वैचारिक नियतकालिके' या विषयावर, परिसंवाद आयोजित करण्यात आला, त्यावेळी बीज भाषण करताना ते बोलत होते. झाशी राणी चौकातील विदर्भ साहित्य संघाच्या, अमेय दालनात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, प्रदीप दाते होते.

---------------------------------------------------

प्रशिक्षण कार्यक्रम

यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय अर्थात वाय.सी.सी.ई., नागपूर इथल्या उप-योजित रसायनशास्त्र विभागानं, सी.एस.आय.आर.नीरी, नागपूर यांच्या सहकार्यानं, "ग्रीन हायड्रोजन: संभाव्य आव्हानं आणि अनुप्रयोग" या संकल्पनेवर, राष्ट्रीय स्तरावरील एक आठवड्याचा, ऑनलाइन अल्प-मुदतीचा प्रशिक्षण कार्यक्रम अर्थात एस.टी.टी.पी. यशस्वीरित्या आयोजित केला. या कार्यक्रमात देशभरातील १६० प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग व्यावसायिकांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. उद्घाटन समारंभाला, वाय.सी.सी.ई.चे प्राचार्य, डॉ.उदय वाघे यांनी, जागतिक कार्बन न्यूट्रॅलिटी प्राप्त करण्यासाठी, ग्रीन हायड्रोजनची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.

---------------------------------------------------

नंबर प्लेट

केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार, राज्य शासनानं सर्व वाहनांना, हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार वाहन धारकांनी, ३१ मार्च २०२५ पूर्वी नंबर प्लेट बसवावी असं आवाहन, प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आलं आहे. एच.एस.आर.पी. नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी, mhh-srp.com पोर्टल निश्चित करण्यात आलं असून, वाहन धारकांनी, पोर्टलवर बुकींग करून, त्यांच्या सोईप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन, एच.एस.आर.पी. नंबर प्लेट, ३१ मार्च २०२५ पूर्वी बसवून घ्यावी.

---------------------------------------------------

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं, वर्तवलेल्या अंदाजानुसार आज, गोंदिया, अमरावती, अकोला आणि नागपूर या जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी विजेच्या

**कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, आज सर्वात कमी तापमान गडचिरोलीत १८ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस करण्यात आलं.**

**--------------------------------------------------**